महासागर
e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

# तालुका कृषी अधिकारी पदांवर काही रुजू, काहींची प्रतीक्षाच

**खामगाव (का.प्र.)** : राज्यातील कृषी विभागात काही दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणावर बदल्या करण्यात आल्या असून, अकोला, बुलडाणा जिल्ह्यांत पहिल्यांदा जवळपास सर्वच ठिकाणी नेमणुका करण्यात आल्या. बदल्या झालेले बरेच अधिकारी पदभार देऊन गेले. मात्र, त्या जागेवर बऱ्याच ठिकाणी अधिकारी रुजू झालेले नसल्याचे दिसून येत आहे.

एकीकडे तालुका कृषी अधिकारी पदे भरण्यात आली तर मंडळ अधिकाऱ्यांची पदे बऱ्याच ठिकाणी रिक्त ठेवण्यात आली आल्याचेही चित्र आहे. अकोला व बुलडाणा जिल्ह्यांतील कार्यकाळ पूर्ण झालेल्या तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या पदांवर नव्या नेमणुका देण्यात आल्या.

सध्या खरीप हंगामाची लगबग सुरू झाली असून, बी-बियाणे, खते, कृषी सल्ला, अनुदान यांसारख्या विषयांबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अशा परिस्थितीत काही तालुक्यांमध्ये अधिकारीहर नसल्याने शेतकऱ्यांना वेळेवर सेवा मिळण्यात अडचणी येऊ शकतात. मूर्तिजापूर येथे दीपक तायडे हे रुजू झाले आहेत. पातूर, अकोट, अकोला या तालुक्यांत नवीन अधिकारी रुजू होण्याची प्रतीक्षा आहे. जिल्ह्यात मंडळ कृषी अधिकाऱ्यांची पदे बरीच रिक्त ठेवलेली आहेत. बुलडाणा जिल्ह्यातही संग्रामपूर तालुका कृषी अधिकाऱ्यांची अमरावती येथे रामेतीला बदली करण्यात आली. त्यांच्या जागेवर नियुक्त केलेले अधिकारी रुजू झालेले नाहीत. चिखली, सिंदखेडराजा येथे नवीन अधिकारी आलेले नाहीत. काही ठिकाणी बदली होऊन येत असलेल्या अधिकाऱ्यांना ते कार्यरत असलेल्या मूळ ठिकाणावरून कार्यमुक्त केले नसल्यानेही रुजू होण्यास विलंब होत असल्याचा दावा कषी विभागातन होतो आहे. बदलीनंतर काही दिवसात नव्या ठिकाणी रुजू होण्यासाठी वेळ दिला जातो. मागील काही वर्षे या भागात तालुका कृषी अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त ठेवलेली होती. पहिल्यांदा सर्वच ठिकाणी कृषी आयुक्तालयाने अधिकारी देत अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. आता फक्त अधिकारी रुजू होऊन कामकाजाला गती देण्याची आवश्यकता आहे. परंतु काही जण परस्पर बदल्यांच्या मूडमध्ये असल्याचे दिसून येत आहे. किती अधिकारी बदलीनुसार नव्या ठिकाणी येतात हे लवकरच स्पष्ट होईल.

# नुकसानीचा मोबदला न मिळाल्याने तरुणाचा आ.डॉ. कुटे यांचे निवासस्थान जाळण्याचा प्रयत्न



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** - बावनबीर येथील शेतकऱ्याचे मागील वर्षी अतिवृष्टीमुळे शेतीचे झालेल्या नुकसानीचा मोबदला न मिळाल्याने या शेतकऱ्याने चक्क शासनाविरोधात रोष व्यक्त करत जळगाव जामोद विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांचे निवासस्थान गाठुन पेट्रोल टाकून घर जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना १३ जून रोजी मध्यरात्री उघडकीस आली. या घटनेमुळे संपूर्ण मतदारसंघात एकच खळबळ उडाली आहे.

१३ जून च्या रात्री साडेसात ते आठच्या सुमारास आ. संजय कुटे यांच्या जळगाव जामोद येथील निवासस्थानी संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर येथील शेतकरी तरूण विशाल मुरुख याने आ. डॉ.संजय कुटे यांच्या निवासस्थानाच्या परिसरात प्रवेश मिळवला व हातात खाली पेट्रोलची कॅन घेऊन जोर-जोरात म्हणाला मला मागील वर्षीच्या अतिवृषटीमुळे झालेल्या नुकसानीचा मोबदला अद्याप मिळाला नाही. केवायसी केल्यानंतर सुध्दा तहसील कार्यालय संग्रामपूर यांनी अनुदान खात्यावर जमा न मिळाल्याने मी आमदारांचा बंगला जाळून टाकतो असे म्हणत पेट्रोलची खाली कॅन घेऊन बंगल्याच्या प्रवेश द्वारकडे जात असताना आ. डॉ संजय कुटे यांचे स्विय सहाय्यक प्रकाश राऊत यांनी त्या शेतकरी तरूणाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

याप्रकरणी पोलिसांनी शेतकरी विशाल मुरुख यांच्याविरुद्ध कलम ३३३,३५१(२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपी विशाल मुरुख यास पोलिसांनी न्यायालया समक्ष हजर केले असता न्यायालयाने विशाल मुरूख यांची जामिनावर सुटका करण्यात आली घटनेचा पुढील तपास जळगाव जामोद ठाणेदार श्रीकांत निचळ यांच्या मार्गदर्शनात पोहेकॉं. संजय वेरूळकर करीत आहेत.

# बुलढाणा पोलिसांची कामगिरी २२ मोबाईल केले परत

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - शहर पोलिस स्टेशन हद्दीतून चोरी झालेल्या मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांचा यशस्वीरित्या उलगडा करीत तब्बल २२ मोबाईल जप्त करण्यात आले असून १४ जून रोजी शहर पोलीस स्टेशन येथे सर्व मोबाईल मुळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे, जळगाव, अकोला, जालना यासारख्या परजिल्ह्यात या मोबाईलचा शोध लागला आहे. अनोळखी तरुणांकडून काही लोकांनी हे मोबाईल विकत घेतले असल्याची माहिती आहे. मोबाईल चोरीच्या विविध गुन्ह्याच्या संदर्भाने शहर पोलिसांचे विशेष पथक नेमण्यात आले. या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे मोबाईलचा शोध लावला. तब्बल ३ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. सदरची कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहर ठाणेदार रवि राठोड यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक रवी मोरे, हेड कॉन्स्टेबल संदीप कायंदे, कॉन्स्टेबल युवराज शिंदे, विनोद बोरे, मनोज सोनूने, कौतिक बोर्डे, विशाल बनकर या पथकाने केली.

# कमी पटसंख्या असलेल्या २० शाळेवरील शिक्षकांना जि. प. प्रशासनाने केले निलंबित

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** जिल्हयात १ ते १० पटसंख्येच्या अनेक शाळा असून सदर शाळेवर गत अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या अकार्यक्षमतेमुळे शाळांच्या पटसंख्येमध्ये घट झाल्याचा ठपका ठेवून जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी या शाळेवरील शिक्षकांना निलंबित केले आहे. जि. प. ने जा. क्र. बुजिप/शिप्रा/प्रा-२/शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद बुलडाणा ११ जुन २०२५ रोजीच्या या पत्रान्वये गटविकास अधिकारी,पंचायत समिती बुलडाणा, चिखली, मेहकर, लोणार, खामगाव, शेगाव, नांदुरा व मोताळा यांना कळविले आहे की, जिल्हयात १ ते १० पटसंख्येच्या अनेक शाळा असुन सदर शाळेवर गत अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या अकार्यक्षमतेमुळे शाळांच्या पटसंख्येमध्ये लक्षणीय घट झाल्याचे दिसून येत आहे. शिक्षकांसोबत झालेल्या बैठकीत संबधित शाळांच्या शिक्षकांना घटलेल्या पटसंख्येच्या प्रश्नाबाबत समर्पक खुलासा देता आला नाही. त्यामुळे घटलेल्या पटसंख्येसाठी संबधीत शिक्षक जबाबदार असल्याचे सकृतदर्शनी आढळून येते.

सदर शाळांची यादी खालीलप्रमाणे आहे.बुलडाणा - जि.प.म.उ.प्रा.शाळा सागवन, जि.प.म.प्रा.शाळा भादोला वाडी, जि.प.म.प्रा.शाळा हनवतखेड, जि.प.म.प्रा. शाळा मढ ऊर्दू ,चिखली - जि.प.म.प्रा.शाळा सावरखेड खुर्द,जि.प.म.प्रा.शाळा वैदुवाडी , मेहकर -जि.प. म.प्रा.शाळा पोखरी , जि.प.म. प्रा.शाळा नागझरी खुर्द, लोणार - जि.प.म.प्रा.शाळा मढी, जि.प.म.प्रा.शाळा रायगाव वस्ती,खामगाव-जि.प. म.प्रा. शाळा दोंदवाडा,शेगाव -जि.प.म.प्रा.शाळा गोळेगाव खुर्द, नांदुरा - जि.प.म.प्रा.शाळा खेडगाव,जि.प.म.प्रा.शाळा, कोदरखेड, जि.प.म.प्रा. शाळा हिंगणा दादगाव, जि.प.म.प्रा.शाळा वडगाव डिघी, जि.प.म.प्रा.शाळा सांगवा, मोताळा - जि.प.म.प्रा. शाळा चिंचखेड खुर्द,जि.प.म.प्रा .शाळा रिधोरा, जि.प.म. प्रा. शाळा वाडी उपरोक्त शाळांवर कार्यरत असलेल्या शिक्षकांना तात्काळ निलंबित करुन त्यांना कार्यरत पंचायत समिती मुख्यालय देण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.

# खामगाव - पंढरपूर विशेष रेल्वेच्या दोन फेऱ्या

**खामगाव (का.प्र.)** - आषाढी एकादशीसाठी पंढरपूर येथे जाण्याकरीता खामगाव रेल्वेस्थानकावरून यंदाही विशेष विठ्ठल दर्शन एक्सप्रेसच्या दोन फेऱ्या राहणार आहे. त्यामुळे भाविकांनी विठ्ठल दर्शन एक्सप्रेसचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पंढरपूर जाण्यासाठी खामगाव रेल्वेस्थानकावरून ३ व ६ जूलै रोजी विठ्ठल दर्शन एक्सप्रेस पंढरपूरसाठी रवाना होणार आहे. खामगाव येथून पंढरपूर जाणारी गाडी क्र.०११२१ ही ३ जूलै रोजी सकाळी ११.३० वाजता निघणार असून पंढरपूर येथे ४ जूलै रोजी पहाटे ३ वाजता पोहोचणार आहे. तर पंढरपूर येथून ४ जूलै रोजी सकाळी ५ ला निघून ती संध्याकाळी ७ वाजता पोहोचणार आहे. ६ जूलै रोजी सकाळी ११ वाजता निघणारी विठ्ठल दर्शनची दुसरी फेरी ही ७ जूलै रोजी पहाटे ३ वाजता पोहोचणार आहे. आणि ७ जूलै रोजी पहाटे ५ वाजता निघणारी विठ्ठल दर्शन एक्सप्रेस संध्याकाळी ७ वाजता खामगावात दाखल होणार आहे

# बच्चू कडु यांच्या मागण्या मान्य न झाल्यास रस्त्यावर उतरू - प्रसेनजीत पाटील



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** - २०२४ विधानसभा निवडणुकीत शेतकरी कर्जमाफी, दिव्यांगाना मानधन वाढ तसेच विविध आश्वासन महायुती सरकारने दिली होती. परंतु जवळपास १ वर्ष होत आले तरी सरकारला त्या आश्वासनाचा विसर पडला आहे. शेतकरी नेते बच्चू कडु यांनी शेतकरी कर्जमाफी, दिव्यांगाना मानधन वाढ सोबतच विविध १७ मांगण्यासाठी गेल्या ७ दिवसापासुन अमरावती जिल्ह्यातील मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन चालू आहे.

१३ जुन रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, जिल्हा कार्याध्यक्ष प्रसेनजीत पाटिल यांनी मोझरी येथे आंदोलनाला भेट देऊन जाहिर पाठिंबा दिला.तसेच जळगाव जामोद राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने एक दिवशीय लाक्षणीक उपोषण करुन आंदोलनाला पाठिंबा देण्याचे जाहिर केले.

आज १४ जुन रोजी जिल्हा कार्याध्यक्ष प्रसेनजीत पाटिल यांच्या नेतृत्वात लाक्षणीक उपोषण करण्यात आले.

वंचितचे विजय पोहनकार, प्रहार दिव्यांग सेलचे तालुकाध्यक्ष नारायण महाले, एम.डी.साबीर, प्रमोद सपकाळ, करीम खान यांनी आपले मनोगत व्यक्त करुन सरकारने मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचे जाहिर केले.किसान एकता महासंघाचे राजेंद्र ससाने, एमआयएम चे समीर आर्यन, काँग्रेसचे अब्दुल जहिर यांनी आंदोलनाला भेट देऊन पाठिंबा दिला.यावेळी प्रसेनजीत पाटिल, विश्वासराव भालेराव, विजय पोहनकार, प्रमोद सपकाळ, ईरफान खान, एम.डी. साबीर, शेख जावेद, अँड. करीम खान, अँड. मोहसीन खान, महादेव भालतडक, मनोहर वाघ, बंडू पाटिल, सुभाष कोकाटे, आशिष वायझोडे, दत्ता डिवरे, एजाज देशमुख, एकनाथ ताठे, अताउल्लाह खान, श्रीकृष्ण जाधव, संदिप ढगे, राजु पाटिल अवचार, अजय गिरी, अमित देशमुख, गोकुल बावस्कार, ज्ञानेश्वर तेल्हारकर, दिपक वानखड़े, कैलास मानकर, राहुल चंदनकार, प्रशांत अवचार, गुणवंत वाघ, ज्ञानेश्वर खिरोड़कार, सुपड़ा ताकोते, विजय चोपडे, ओम देशमुख, सैय्यद शाकिर, राजू मुल्लाजी,अतुल वाघ, गजानन भालतडक, शेख मोसीन यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिजाऊ स्मृतिज्योत रथयात्रा सिंदखेडराजा येथून पाचाड स्मृतिस्थळासाठी रवाना

**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी)**- राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या ३५१ व्या पुण्यतिथीनिमित्ताने सिंदखेडराजा येथून पाचाड (किल्ले रायगड) येथील समाधीस्थळाकडे जिजाऊ स्मृतिज्योत रथयात्रेचा भव्य शुभारंभ सकाळी करण्यात आला. यदुकुलभूषण राजे लखुजीराव जाधवराव प्रतिष्ठान आणि लखुजीराजेंच्या वंशजांच्या वतीने या पवित्र स्मृतियात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या रथयात्रेची सुरुवात सिंदखेडराजा येथील माँ जिजाऊ यांच्या पूजनाने झाली.



प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पूजन झाल्यानंतर यात्रेचे विधिवत प्रस्थान करण्यात आले. या प्रसंगी राजे लखुजीराव जाधव यांचे वंशज भागवत राजे जाधव, नरसिंग नारायण जाधव, प्रभाकर राजे जाधव, गोपाल राजे जाधव, आनंद राजे जाधव, डॉ श्रीकांत राजे जाधव,प्रशांत राजे जाधव, अतिश राजे जाधव, रामभाऊ राजे जाधव, कार्तिक राजे जाधव, ऋषी राजे जाधव आदींसह अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांमध्ये आ मनोज कायंदे तोताराम कायंदे, शशिकांत खेडकर, अमित राजे शिर्के, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड.नाझेर काझी,भाजपा प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ, मा नगराध्यक्ष सतीश तायडे, देविदास ठाकरे मा नगराध्यक्ष, भाजपा शहराध्यक्ष ॲड.संदीप मेहेत्रे,ता. अध्यक्ष रा. काँ. प. राजू अंभोरे, ओमप्रकाश महाराज,स्वप्नील मोरे, ऋषिकेश काटे, चंद्रकांत काटे, कृष्णा काटे आकाश सुपेकर,आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींचा समावेश होता.

**चार दिवसांची रथयात्रा ऐतिहासिक मार्ग** - ही स्मृतिज्योत रथयात्रा चार दिवस चालणार असून, तिचा प्रवास जालना, बीड, पाटोदा, कर्जत, बारामती, महाबळेश्वर, प्रतापगड, महाड मार्गे पाचाड (रायगड) येथे संपन्न होणार आहे. प्रथम मुक्काम: बीड, द्वितीय मुक्काम: भुईंज (सातारा) तृतीय मुक्काम: महाड (रायगड) १७ जून रोजी जलाभिषेकाने समारोप १७ जून रोजी पाचाड येथे सिंदखेडराजा येथील पाच विहिरींच्या जलाने जिजाऊ समाधीस्थळी जलाभिषेक करून यात्रेचा समारोप केला जाईल. ही यात्रा केवळ सांस्कृतिक नाही तर राष्ट्रमातेच्या कार्याचा जागर करत भाविकांना प्रेरणा देणारी ठरणार आहे. सकल मराठा समाज, शिवभक्त, युवावर्ग यांचा या यात्रेत उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित असून, यदुकुलभूषण प्रतिष्ठानने संपूर्ण संयोजनाची जबाबदारी पार पाडली आहे.

# सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**बुलडाणा (जिमाका)** - दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने जून महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार १६ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.

# विमान अपघातातील मृतकांना काँग्रेसजणांनी वाहिली श्रध्दांजली




**खामगाव (का.प्र.)**- अहमदाबाद येथे झालेल्या विमान अपघातामध्ये दुर्दैवी मृत्यू पावलेल्या नागरिकांना खामगाव शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने १३ जून रोजी सायंकाळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी खामगाव विधानसभा मतदार संघ समन्वयक ज्ञानेश्वरदादा पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा विद्यमान संचालक राजाराम काळणे, काँग्रेस पक्षाचे नेते शे.जुल्कर शे चांद, प्रदेश सचिव धनंजय देशमुख, महा. प्रदेश काँग्रेस अनु. जाती विभागाचे सरचिटणीस गौतम गवई, अल्पसंख्याक विभागाचे सचिव वसिमोद्दीन भाई, ओबिसी विभागाचे सचिव अजय तायडे, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष तेजेंद्रसींह चव्हाण, शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष स्वप्नील ठाकरे, शेगाव तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष ज्ञानेश्वर शेजोळे, खरेदी विक्री संचालक पांडुरंग राखोंडे, माजी नगरसेवक किशोरआपा भोसले, माजी नगरसेवक इब्राहिम कंडक्टर, माजी जिल्हा परिषद सदस्य गजानन वाकुडकर, जेष्ठ नेते अनंतराव ताठे, माजी पंचायत समिती सदस्य सर्वश्री विठ्ठल सोनटक्के, इनायतभाई, खामगाव ग्रामीणचे उपसरपंच नदीमभाई, सुटाळा खु. उपसरपंच जयेश वावगे, लाखनवाडा उपसरपंच प्रकाश इंगळे, सुधाकर डुकरे, हाफीज खान, कंझारा सरपंच शफीउल्ला खान, डॉ गुफरान खान, किसान काँग्रेसचे नेते मंगेश भारसाकळे, ओबिसीचे युवा नेते सुरज बेलोकार, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष शेख कयुम भाई, किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अतुल सिरसाट, युवक काँग्रेसचे मयूर हुरसाड, मा सरपंच सोपान लाहुडकार, संतोष गावंडे, सेवादलाचे अमित तायडे, शेख राजिक, आवेश खान, सागर पांढरे, संतोष चव्हाण, सौरभ रिछारिया, बबलू भाई सजनपुरी, छोटू राजपूत, राजू पटेल, शेख रहेमान, अक्षय शंकरवार, मो इरफान, इलियास अहमद , रफिक शाह, शेख अनिस, अक्षय पवार, प्रमोद मोरे, गणेश सवडतकर, शेख अयान, शोरब खान, शेरू चौधरी, सैयद जाफर, अनिस दुकानदार, अतर मलिक, आसिफ चंदू, अश्फाक अल्ला, शोयब शेख यांचेसह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोलिस चौकी समोरील नाली व ढापा नवीन बांधण्यात यावा-मागणी



**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)**: पोलीस चौकी नंबर १ समोरील छोटा दरवाजा च्या आतील नाली व ढापा जाम झाल्यामुळे नाली मधील सर्व सांडपाणी रोडवर वाहत आहे नगर पालिका कर्मचाऱ्यांनी आठ ते दहा वेळेस ती नाली साफसफाई केली परंतु नाली च्या आत धाप्याखाली घाण अटकल्यामुळे सर्व सांडपाणी रोडवर वाहत आहे.

त्यामूळे दुर्गा नगर, छोटा बाजार, नस्वाला चौक येथील नागरिकांना नालीच्या सांडपाण्यातून ये-जा करावी लागते. तरी धापा तोडल्याशिवाय पर्याय नाही तो तोडून नवीन नाली व ढापा बांधणे गरजेचे आहे परंतु प्रशासन हे फक्त सफाई कामगार यांना साफ सफाई करण्याकरता पाठवते आहे.

तरी आठ दिवसात हे नाली व धापा तोडून नविन नाली व धापा बांधण्यात यावा अन्यथा नागरिकांच्या वतीने आंदोलन करण्यात येइल या सर्वास नगरपालिका जबाबदार राहील, असा इशाराही नागरिकांच्यावतीने देण्यात आला आहे.

# निरव व कोरडी नदीवरील सिमेंट बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे

## जलसंधारण विभागाचे दुर्लक्ष

**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)**: पाणलोट आधारित नाला उपचारामध्ये सिमेंट नाला बांध उपचारास अनन्य साधारण महत्व आहे. ज्या ठिकाणी मातीचे नाला बांध घेण्यासाठी तांत्रिक दृष्ट्या योग्य जागा उपलब्ध नाही अशा ठिकाणी सिमेंटचे नाला बांध बांधून पाणीसाठा केला जातो. यामुळे भूपृष्ठामध्ये पाण्याच्या पातळीत वाढ होण्यास मदत होवून नाल्यालगतच्या विहीरींच्या पाणी पातळीमध्ये लक्षणीय वाढ होत असते. पर्यायाने विहीरीखालील बागायती क्षेत्रामध्ये वाढ होते.या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून महाराष्ट्र शासनाने सन २०११-१२ पासून राज्यातील टंचाईग्रस्त जिल्हयांमध्ये पाणलोट आधारित उपचाराबरोबरच एकेरी पध्दतीने सिमेंट नालाबांधाचा उपक्रम हाती घेतलेला आहे.

यातच जळगाव जामोद तालुक्यातील सुनगाव येथे ही जलसंधारण विभाग खामगाव यांच्यामार्फत मोठ्या प्रमाणात सिमेंट नाला बांध बनवण्याचे काम सुरू असून यातील तीन सिमेंट बंधारे हे सुनगांव येथील वावडी हरदो या शेतशिवारातील निरव व कोरडी नदी वर होत आहेत.

या ठिकाणी सिमेंट बंधाऱ्यांच्या कामात कमी प्रतीचे साहित्य वापरले जात आहे. वाळू, खडी आणि सिमेंटचे प्रमाण योग्य नसल्याच्या तक्रारी आहेत. यामध्ये नदीतीलच माती मिश्रित वाळू व दगड वापरल्या जात असून लोखंड ही अत्यल्प प्रमाणात व त्याची साईज ८ एमएम एवढीच असुन



बंधाऱ्याला आतापासूनच भेगा पडल्याचे दिसून येत आहे. तर या पावसाळ्यात येणाऱ्या नदीच्या पुरामुळे हे सिमेंट बांध तुटण्याची शक्यता निर्माण झाली असून यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊन शेतातील पिके उध्वस्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी सिमेंट बांधाचे काम थांबवले असून, या कामाची देखरेख करणारे ज्युनियर अभियंता कवाडे हे चौकशीच्या घेऱ्यात येत असून यांनी आर्थिक देवाण घेऊन या सिमेंट बंधाऱ्याचे कामावर जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. कवाडे यांच्या दुर्लक्षामुळे ठेकेदार मात्र आपल्या मनमर्जीने अतिशय निकृष्ट असे बंधाऱ्याचे काम करत असून अंदाजपत्रका नुसार काम करीत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे जलसंधारण विभागाचे वरिष्ठ अभियंता यांनी या कामांची चौकशी करून कनिष्ठ अभियंता कवाडे व बंधाऱ्याची निर्मिती करणाऱ्या ठेकेदारावर योग्य ती कारवाई करून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी येथील स्थानिक नागरिक, शेतकरी व लोकप्रतिनिधींनी केली आहे.

महासागर

रविवार दि. १५ जून २०२५

# खामगाव

(बुलडाणा)



# वीज वितरण कंपनीच्या मुदतबाह्य व ओव्हरलोड विद्युत रोहित्र (डीपी) त्वरित बदला

## सुरेशदादा पेठकर यांची जिल्हाधिकारी व पालकमंत्र्यांकडे मागणी

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी):** शहरातील मुख्य बाजारपेठ सह मध्यवर्ती भागातील गेल्या अनेक वर्षांपूर्वीच्या मुदतबाह्य झालेल्या व त्यावर अतिरिक्त मोठ्या प्रमाणामध्ये ओव्हरलोड असल्यामुळे नांदुरा शहरात बरेच दिवसापासून विद्युत डीपी अचानकपणे आग लागण्याचे प्रकार होत आहे.



त्यामुळे सर्वसामान्य नागरिक व जनता विजेचे लपंडावामुळे फार मोठा संकटांना तोंड द्यावे लागत आहे यासाठी शहरातील बाजारपेठेसह मध्यवर्ती भागातील रहिवासी भागातील मुदत बाह्य व अतिरिक्त भार असलेल्या विद्युत डीपी त्वरित बदल द्यावे अशी मागणी शहरातील सामाजिक कार्यकर्ते सुरेशदादा पेठकर यांनी जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांच्याकडे केली आहे.

नांदुरा शहरात गेली वीस वर्षांपूर्वी विज कंपनीचे अभियंता मिसाळ व अवचार यांनी शहरातील अनेक भागात नवीन विद्युत रोहित्र बसवल्या त्याचप्रमाणे शहरातील श्री अंबादेवी गड, जामा मस्जिद, पोळावेस, भगवान महावीर मार्ग, आठवडी बाजार, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, बुलढाणा रोड. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, मोतीपुरा या भागातील विद्युत अनेक वर्षांपूर्वीपासून असून त्यावर मोठ्या प्रमाणामध्ये अतिरिक्त भार होत असल्यामुळे व मुदतबाह्य झाल्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये आगीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

नांदुरा शहराची वाढती लोकसंख्या व विद्युत वापर लक्षात घेता लोकप्रतिनिधी अधिकारी वर्गाने शहरातील जुन्या कालबाह्य व मदत बाह्य अतिरिक्त भार असलेल्या कंपनीच्या विद्युत डीपी बदलण्याची तातडीने करावी करावी जेणेकरून सर्वसामान्य रहिवासी नागरिक या समस्येपासून मुक्त होतील व भविष्यात कोणते प्रकारच्या त्रास होणार नाही याची वीज कंपनीचे वरिष्ठ अधिकारी व अभियंता यांनी दाखल घेणे गरजेचे आहे. तरी शहरातील मुदतबाह्य झालेल्या विद्युत डीपी त्वरीत बदलावी, अशी सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ पत्रकार सुरेशदादा पेटकर यांनी बुलढाणा जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांच्याकडे सदर मागणी केली आहे.

# प्रहार जनशक्तीकडून आज चक्काजाम

## शेतकरी हितासाठी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन

**खामगाव (का.प्र.):** शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी व्हावी यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चुभाऊ कडू यांनी मोझरी येथे अन्यथा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून उद्या संपूर्ण राज्यात चक्काजाम आंदोलन करण्यात येणार असून खामगाव-अकोला मार्गावर देखील सदर आंदोलन करण्यात येणार आहे. तरी शेतकरी हितासाठी आपण सहभागी व्हा असे आव्हान प्रहार चे खामगाव तालुक्यातील नेतृत्व गजानन लोखंडकर यांनी केले आहे.



८ जून पासून बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे मात्र अजूनही राज्य सरकारकडून अजूनही याकडे दुर्लक्ष केलं जात आहे. बच्चूभाऊंची प्रकृती गंभीर होत चालली असताना अजूनही त्यांच्या मागण्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. सरकारने हे आंदोलन ऐकण्याऐवजी त्याला दडपण्याचा प्रयत्न केला. लोकशाहीत प्रश्न विचारणं गुन्हा आहे का? शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आवाज उठवणं चुकीचा आहे का? असा सवाल आज उभा ठाकला आहे.उपोषण करणाऱ्यांची तब्येत दिवसेंदिवस खालावत आहे. आंदोलनाला दडपून नाही, तर संवादातून उत्तर मिळायला हवं.आम्ही माघार घेणार नाही, हे आंदोलन अजून तीव्र करण्यात येणार असून उद्या सकाळी १० वाजता ते पूर्ण फाटा येथे चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. तरी शेतकरी हितासाठी त्या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन गजाननराव लोखंडकर यांनी केले आहे

# जागतिक रक्तदाता दिनानिमित्त ३५ रक्तदात्यांनी रक्तदान

**खामगाव (का.प्र.):** रक्तसेवेत सदैव अग्रेसर राहणाऱ्या एकनिष्ठा गौ-सेवा रक्तसेवा फाउंडेशनने जागतिक रक्तदाता दिवस ३५ रक्तदात्यांनी गरजु रुग्णांना वेळेवर रक्तदान करून दिले नवीन जिवनदान देऊन साजरा केला. खामगांव येथील सामान्य रुग्णालयात भरती असलेले व तसेच खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना रक्ताची मदत करण्यात आली.



एकनिष्ठा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या यादव यांच्या संकल्पेनेतून थैलीसिमिया, सिकलसील, गरोदर महिला, एच आय व्ही. अपघात ग्रस्त रुग्ण, ईतर आजार असलेल्या गरजु रुग्णांसाठी पुढाकार घेत १४ जून जागतिक रक्तदाता दिवस गरजूला रक्तदान करून साजरा केला.

यावेळी रक्तदाते विशाल भवर , हरीदास चरखे , धिरज सुसगोहर , कृष्णा चव्हाण , प्रदीप गवई , आकाश शेजव , सुरज हेलोडे , अमोल टिकार, अनिकेत गलांडे, गोपाल ईटीवाले , देवेश पारीक , पियुष काळोणे, नामदेव कुटे, किर्तीकुमार पुरोहीत, अमोल खवले, मोहन डाबेराव , अमोल मुकुंद , विश्वजीत इंगळे , ओमकार खवले , भुषण देशमुख , अनंता उगले , दिपक नेमाने , सुजित सावंग , कृष्णा राठी , जिवन धंदर , दिलीप शेजव , विशाल शेजव , अक्षय इंगळे , अतुल गलवाडे , आनंद कलोर , राहुल देशमुख , रविंद्र राऊत , चेतन कदम , समिर पठाण आदि रक्तनायकांनी रुग्णाचे प्राण वाचवून त्यांना रक्तदान करून दिले जिवनदान याप्रसंगी जिल्हा पर्यवेशक एड्स नियंत्रण श्री गजानन देशमुख व श्री संतोष दारमोडे शासकीय रकतपेढीचे रक्तसंक्रमण अधिकारी सौ. प्रणाली देशमुख , टेक्निशियन सौ. सपना कांबळे , सौ. चित्रा देशपांडे , सौ.राजश्री पाटील, परिचारिका भारती काळे, अशोक पराते, कु. ममता भारसाकळे , कु. आरती थोरात, कु. प्रिया गुरेकार यांचे सहकार्य लाभले

# सर्वधर्मीय गुणवंत विद्यार्थ्यांचा मराठा सेवा संघाचे वतीने सत्कार

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी):** दरवर्षी प्रमाणे यंदाही सर्वधर्मिय गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन मराठा सेवा संघाच्या वतीने शनिवार २१ जून रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवराय मराठा मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आले असून पात्र गुणवंत विद्यार्थ्यांनी त्यांची नावे लवकरात लवकर नोंदवावी, असे आवाहन मराठा सेवा संघ परिवार मलकापूर शहर व तालुक्याच्या वतीने जिल्हा सचिव इंजि.सचिन तायडे यांनी केले आहे.



**मलकापूर तालुक्यातील सर्व शाळांमधून सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची सद्यस्थितीतील माहिती प्राप्त केली असून तालुकानिवासी मात्र काही कारणास्तव तालुका बाहेर शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी विद्यार्थ्यांची गुणपत्रिका, निवासी पत्ता, मोबाईल नंबर पाठवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.**

तालुक्यातील इयत्ता दहावी परिक्षेत ८५ टक्के पेक्षा जास्त व बारावीच्या परिक्षेत ८० टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या सर्वधर्मिय विद्यार्थ्यांचा तसेच विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळविणाऱ्या, नामांकित विद्यालयात प्रवेश मिळालेले विद्यार्थी, शैक्षणिक क्षेत्रासह क्रीडा, किंवा इतर क्षेत्रात प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव आयोजन २१ जून रोजी करण्यात आले असून मलकापूर तालुक्यातील सर्व शाळांमधून सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची सद्यस्थितीतील माहिती प्राप्त केली असून तालुका निवासी मात्र काही कारणास्तव तालुक्याच्या बाहेर शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी विद्यार्थ्यांची गुणपत्रिका, निवासी पत्ता, मोबाईल नंबर मराठा सेवा संघ कार्यालय डवले कॉम्प्लेक्स हनुमान नगर रोड, विद्यार्थी किंवा पालकांना स्वतः येऊन देणे शक्य नसल्यास त्यांनी उल्हासराव संबारे मो.९८५०७२७३५६, संजय रहाटे मो. ९९२२२०३५५१, रविंद्र खराटे मो.९७३०९१५००१, विष्णू म्हैसागर मो.९४२२१००९३३ यांच्या मोबाईल क्रमांकावर पाठवावे, असे आवाहन मराठा सेवा संघ परिवार मलकापूर शहर व तालुक्याच्या वतीने जिल्हा सचिव इंजि.सचिन तायडे यांनी केले आहे.

## थोडक्यात

### डोळ्यात मिरची पावडर टाकून साडे पाच लाखाची बॅग हिसकण्याचा प्रयत्न

**खामगाव (का.प्र.):** स्थानिक सनी पॅलेस टॉकीज जवळून ११ जून २५ रोजी दुपारी ३.४० वाजताच्या सुमारास मंगलसिंग विजयसिंग पवार (वय २१, रा.कदमापुर) हे ५ लाख ६९ हजार ८६० रू. असलेली बॅग घेऊन सहकाऱ्यासोबत पायी जात असतांना पाठीमागून आलेल्या दुचाकीस्वाराने मंगलसिंग पवार व सहकाऱ्याच्या डोळ्यात मिरची पावडर टाकुन पवार यांच्या हातातील बॅग हिसकण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी दोघांनी प्रतिकार केल्यामुळे दुचाकीस्वाराने पोबारा केला. तर मंगलसिंग पवार हे मोठी रक्कम असलेली बॅग घेवून जात असल्याची माहिती मिळाल्यावरून दुचाकीस्वाराने पाठलाग केला असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. याप्रकरणी मंगलसिंग पवार यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये अनोळखी इसमाविरूध्द कलम ३०९ (५) भान्यास नुसार गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास एपीआय भागवत मुळीक करीत आहेत.

### वीज पडून १७ शेळ्या ठार



**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी) -** मोताळा तालुक्यातील शेलापूर बु. येथे १२ जून रोजी संध्याकाळी ६.३० वाजेदरम्यान शेलापूर शिवारातील पांडुरंग शंकर पाटील आणि श्रीराम पंढरी खराटे यांच्या शेताजवळ ओंकार नारायण वाघ आणि सुधाकर भिकाजी बोरसे हे आपल्या व इतरांच्या शेळ्या चारत असतांना वीज पडून सुमारे १७ शेळ्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. यामध्ये १७ शेळ्यांपैकी ओंकार नारायण वाघ यांच्या २ शेळ्या, निना वैतकार १ शेळी, ईश्वरदास बावस्कार २ शेळ्या, सुधाकर बोरसे यांच्या ४ मेंढ्या, १ मेंढा आणि ७ शेळ्या अशाप्रकारे नुकसान झाले. घटनास्थळी महसूल अधिकारी विश्वनाथ उबरहंडे यांनी भेट देवून पंचनामा करून वरिष्ठांना अहवाल पाठविला आहे. शासनातर्फे योग्य ती नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी संबंधितांनी केली आहे.

### वडाची झाडे लावून वटपौर्णिमा साजरी

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी):** विदर्भ महाविद्यालय बुलडाणा येथे वटपौर्णिमानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'एक पेड मॉं के नाम' या घोषणे अंतर्गत राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने मुलींनी महाविद्यालय परिसरात वटवृक्षाची लागवड कऊश्न आगळ्या वेगळ्या पध्दतीने वटपौर्णिमा साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गोविंद गायकी व प्रा. डॉ.संगिता पवार, प्रा.मुनेश्वर जमईवार, प्रा. सिमा काळणे तसेच राष्ट्रिय सेवा योजनेचे समन्वयक प्रा.वैभव वाघमारे हे उपस्थित होते. वृक्षाचे संगोपन करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थीनींनी झाडांना दत्तक घेतले असून एक विद्यार्थी एक झाड याप्रमाणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देउन लागवड व संगोपन वर्षभर करणार आहे, असे रासेयोचे समन्वयक प्रा. वैभव वाघमारे यांनी सांगितले.

# आरोग्यदायी बदाम : आयडीए नागपूरचे तज्ञांद्वारे मार्गदर्शन कार्यक्रम

**खामगाव (का.प्र.):** इंडियन डायटेटिक असोसिएशन (आयडीए) च्या नागपूर विभागाने अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्निया यांच्या सहकार्याने शहरातील हॉटेल सेंटर पॉइंट येथे आहारतज्ञ आणि न्यूट्रिशन प्रोफेशनल्ससाठी एक शैक्षणिक सत्र आयोजित केले. या सत्राचा उद्देश बदामांमध्ये असलेल्या पोषणमूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि दैनंदिन आहारात बदामांचा समावेश केल्यास मिळणारे आरोग्यदायी फायदे सर्वांपर्यंत पोहोचवणे हा होता.




हे सत्र न्यूट्रिशन आणि वेलनेस कन्सल्टंट श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. त्यांनी हृदयविकार आणि मेटाबोलिक आरोग्य, स्नायूंना होणारे फायदे आणि रक्तातील साखरेचे नियमन या विषयांवर झालेल्या तीन महत्त्वपूर्ण संशोधनांचा आढावा घेतला. यानंतर झालेल्या पॅनल चर्चेमध्ये श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्यासोबत डॉ. कविता गुप्ता (सचिव, आयडीए नागपूर विभाग) आणि डॉ. रेनुका माईंदे (कोषाध्यक्ष, आयडीए नागपूर विभाग) सहभागी झाल्या होत्या. डॉ. कविता बक्षी (संयोजिका, आयडीए नागपूर विभाग) यांनी चर्चा सत्राचे सूत्रसंचालन केले.

या चर्चेसाठी आवश्यक संशोधन अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाने प्रायोजित केले होते. या संशोधनामध्ये पाउला आर टुम्बो, जेमी अर्ड, फ्रान्स बेलिस्ले, ॲडम ड्रेवनोव्स्की, जॅक ए गिल्बर्ट, रोनाल्ड क्लेनमन, अनुप मिश्रा, जॉन सिव्हनपिपर, माहा ताहीरी, कॅरोल ई वॉटसन, जेम्स हिल, मार्क कर्न, विश्वनाथन मोहन आणि सुधा वासुदेवन या नामवंत आहारतज्ज्ञ आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी योगदान दिले. त्यांच्या अभ्यासातून हे निष्पन्न झाले की दररोजच्या आहारात बदामांचा समावेश केल्याने आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो.

या कार्यक्रमात श्रीमती शीला कृष्णस्वामी यांनी करंट डेव्हलोपमेंट्स इन न्यूट्रिशन मध्ये प्रकाशित झालेल्या तज्ज्ञांच्या अभ्यासांवर आधारित माहिती दिली. त्यानुसार दररोज बदाम खाल्ल्याने एलडीएल (बॅड कोलेस्ट्रॉल) कमी होण्यास मदत होते आणि डायास्टोलिक ब्लड प्रेशर थोडकं कमी होते जे दोन्हीही हृदयाच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे आणि त्याचा वजनावर कुठलाही वाईट परिणाम होत नाही. विशेषतः प्रीडायबेटिस असलेल्या भारतीयांमध्ये बदाम सेवनामुळे रक्तातील साखरेचे नियंत्रण चांगले राहते.

कृष्णस्वामी म्हणाल्या, दररोज मूठभर बदाम खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते. बॅड कोलेस्ट्रॉल कमी होतो, थोडक्यात रक्तदाबही कमी होतो आणि वजन वाढत नाही. काही लोकांचे वजन थोडं कमीही होऊ शकतं आणि त्यांचे ब्लड शुगर लेव्हल चांगले नियंत्रित राहू शकतात. हा आरोग्याची काळजी घेण्याचा एक सोपा आणि चविष्ट मार्ग आहे.

# भूमिमूक्त मोर्चाच्या वतीने बुलडाण्यात जेलभरो



**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी):** महसूल व वन जमिनीवरील अधिकारासाठी भूमिमुक्त मोर्चाच्या वतीने बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जेलभरो आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व संस्थापक अध्यक्ष प्रदीप अंभोरे यांनी केले. या आंदोलनात त्यांच्या प्रमुख मागण्या म्हणजे महसूल व वन जमिनीवरील पात्र व अपात्र दावेदारांना शासकीय जमिनीवर पेरणीपूर्व मशागत व पेरणी करण्याची परवानगी द्यावी, अतिक्रमित शेत जमिनीवर प्रस्तावित असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांना तात्काळ स्थगिती द्यावी, तसेच निवासी घरपट्टी कायम करावी. याशिवाय घरकुलासाठी मिळणारे अनुदान वाढवून अडीच लाख रुपये करण्यात यावे, अशा विविध मागण्यांसाठी जिल्ह्यातील शेकडो शेतकरी बांधव व महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आंदोलकांनी एकजुटीने आंदोलन केले. यावेळी प्रशासनाकडून आंदोलनस्थळी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तसेच आंदोलकांनी घोषणाबाजी करत आपली मागणी मांडली असता, पोलीस प्रशासनाने त्यांना ताब्यात घेऊन स्थानबद्ध केले.

नियमित वाचा
महासागर

# मयताच्या वारसाला बुलढाणा अर्बन कडून आर्थिक मदत



**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी):** तालुक्यातील निवाणा येथील व संग्रामपूर शहरातील रहिवाशी असलेले सुनील यशवंत मोहें यांचा १३ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वतःच्या शेतातील विहिरीचे बांधकामाला पाणी मारत असतांना विहीर घसरली त्यामध्ये त्याचा दुर्दवी अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

या घटनेची माहिती मिळताच बुलढाणा अर्बन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर यांच्या संकल्पनेतून बुलढाणा अर्बन मार्फत सभासदांना विविध सेवा प्रदान करण्यात येतात त्यापैकीच एक सेवा सभासद यांचा अपघाती मृत्यू झाल्यास संस्था त्यांना विमा संरक्षण देते. त्यानुसार शाखा संग्रामपूर येथील सोनेतारण कर्जदार सभासद सुनील यशवंत मोहे यांचा विहिर बांधकामाला पाणी मारत असतांना विहीर घसरली. त्यामध्ये त्याचा दुर्दैवाने अपघाती मृत्यू झाला होता.

ह्या घटनेची माहिती मिळताच बुलडाणा अर्बन शाखेच्या वतीने मृतक मोहे यांचे कुटुंबातील व्यक्तींना सोने तारण कर्ज निमित्तानं व्याजासाह २ लाख ९ हजार १५७ रु.चा धनादेश प्रदान करण्यात आला.

संस्थेचे संचालक डा.किशो केला व विभागीय व्यवस्थापक प्रकाश सावळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा संग्रामपूरचे शाखा व्यवस्थापक संतोष केला यांनी मयत सभासद यांचे घरी स्वतः संपर्क करून बुलढाणा अर्बनच्या सभासदाचा अपघाती मृत्यू विम्याची माहिती देवून संस्थेच्या नियमानुसार कर्जदार यांचे वारस श्रीमती रुपाली सुनील मोहें यांचेकडून आवश्यक असलेल्या कागदपत्राची पूर्तता करून घेवून मयत सभासद यांचे नावाने असलेल्या सोने तारण कर्ज २ लाख रुपये कर्ज व व्याजासह विमा संरक्षण अंतर्गत विमा कंपनी यांचेकडून धनादेश प्राप्त करून कर्जदाराचे वारस श्रीमती रुपाली सुनील मोहें यांना संस्थेचे संचालक डॉ. किशोर केला तसेच सहकार विद्या मंदिर वरवट बकाल जळगाव (जा.)च्या मुख्य संयोजिका डॉ. स्वाती केला यांचे हस्ते वितरण करण्यात आला.

RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव(बुलढाणा)

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलडाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

